# आंबेडकरवादी कवयित्रींच्या जाणिवा

**डॉ. एस. के. इंदोरकर**
राष्ट्रपिता महात्मा गांधी
महाविद्यालय, सावली
९६२३७४९२६७

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार प्रेरणेतून आंबेडकरवादी साहित्याची निर्मिती झाली. बाबासाहेबांच्या विचारांचा वसा घेतलेला समाज 'शिका,संघटीत व्हा व संघर्ष करा' या संदेशाचे पालन करू लागला, त्यांचे आत्मभान जागे झाले. सत्य,असत्याची जाणीव निर्माण झाली. शत्रु, मित्र ओळखण्याची पारख करू लागला. आम्हालाही माणसाप्रमाणे जगता यावे, स्वप्न बघता यावे ज्या गोष्टी या देशातील संवर्ण जातीच्या समुहाला मिळतात तर आम्हाला का नाही? ही न्याय निवाडयाची भाषा तो करू लागला. आपल्या प्राणासंम प्रिय नेत्याच्या शब्दावर त्यांचा विश्वास होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे त्या सर्वासाठी जीव की प्राण होते. त्यांनी दिलेल्या संदेशाने आपले जीवन बदलविण्यासाठी हा वर्ग वाटेल ते संघर्ष करण्याची तयारी करू लागला.

१९५६ नंतर बौद्ध धर्माच्या पर्यावरणात या देशातील तळागाळातील जनसमुहाला पहिल्यांदा स्वातंत्र्याची संवेदना अनुभवता आली. बाबासाहेबांच्या समकालीन व मागे असणारी तरूण पिढी शिक्षित होवू लागली. त्यांना स्वत:च्या अस्मितेची जाणीव निर्माण झाली. आजपर्यंत मिर्माण झालेल्या मराठी पांढरपेशी साहित्यात तो स्वत:ला शोधू लागला. पण त्यातील त्यांचे चित्र धुरकटलेले, अस्पष्ट, लाचार,पंगू असे जाणवले. त्या साहित्यात सर्वत्र अवेहलना, उपहास, वेदना, भूक, दारिद्रय, लाचारी याचा प्रत्यय ते अनुभवीत होता. मराठी साहित्यात या समाजाला स्वाभिमानाचे अस्तित्व मिळाले नाही. बौध्द जनांची ही नवशिक्षित पिढी मराठी साहित्याच्या प्रांगणातील असे हे आपले केविलवाणे रूप पाहून रक्तबंबाळ झाली. जगामधील वंचीतांचा इतिहास त्यांनी अभ्यासला. बाबासाहेबांच्या संदेशाचे त्यांनी पालन केले. त्यांचे चितन मनन सुरू झाले. जगातील शोषित आणि भारतीय दलित यामधील असणारा फरक त्यांना लक्षात आला. आपल्या दु:खातील धग ही अत्यंत तीव्र आहे. आपल्या समस्या वेगळया आहेत आणि म्हणूनच यावरील उपायही वेगळे आहेत. यासाठी 'आपला उध्दार आपणच करू शकतो' हा बाबसाहेबांचा संदेश डोळयासमोर ठेवून तो कथा, कविता, वैचारिक लेखन, नाटक, समिक्षा, आत्मकथने यामध्ये आपली लेखणी प्रभाविपणे चालवू लागला. १९६० च्या दशकात आंबेडकरवादी साहित्याची निर्मिती झाली.

दलित साहित्याच्या निर्मितीमागील मुळ प्रेरणा, आपले महान आणि खंबीर नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत. बाबासाहेबांचा क्रांतीविचार मानवाला हिन मानणाऱ्या संस्कृतीचा त्याग करणारी व भगवान बुध्द प्रणीत मानसाला महान मानून जोकी, स्वातंत्र्य, समता, बंधुता न्याय व मानवता वाद शिकवितो. सर्वांना त्यांचे स्वप्न पूर्ण करण्याचा विचार प्रवर्तीत करतो. यावर अधिष्ठीत नवसमाज निर्माण करण्याचा प्रयत्न काही साहित्यिकांनी आपल्या समर्थ लेखणीच्या साहाय्याने केला. कथा, कविता, नाटक, आत्मकथन, निबंध आदिक्षेत्रात त्यांनी चढाई करून यशस्वीपणे किल्ले सर केले. झपाटल्यागत ही पिढी लिहीत राहिली. याचा परिणाम या देशातील अनेक समाजावर झाला. अनुसुचित जाती, जमाती, आदिवासी, ओबीसी, विमुक्त जाती, अल्पसंख्यांक यांच्यापर्यंत हे साहित्य गेले. त्यांनाही मुक्तीची जाणीव झाली. ते

स्वत:च्या समाजाचा उध्दार करण्याच्या प्रयत्नामधून साहित्य निर्मिती करू लागले. तेव्हा त्यांच्या हातूनही कसदार साहित्य निर्माण झाले. दलित साहित्याच्या प्रभावामधूनच ग्रामीण साहित्य जनसाहित्य, स्त्रिवादी साहित्य, आदिवासी साहित्य, देशी साहित्य इत्यादी सर्व साहित्य प्रवाह निर्माण झाले यात दलित साहित्य प्रवाह गतीमान, तीव्रतेची धार असणारे ठरले.

या वातावरणातच आंबेडकरवादी कवयित्रीचे आत्मभान जागृत झाले. दलित कवितेला महामानव डॉ. आंबेडकरांच्या कार्याची व चळवळीची प्रेरणा मिळाली माणूस केंद्रीत विचार दलित कवितेने दिला. देव, धर्मापेक्षा माणूस मोठा आहे. हे दलित कवितेने दिला. ती स्वत:पुरती मर्यादित न राहता सामाजिक आशय रचना, वैचारिक बैठक, सामाजिक वास्तवाची चित्रण करू लागली कवितेतील विद्रोहाबरोबर वैचारिकता, वस्तुनिष्ठता व सामाजिक जाणिवा आपल्यास अनुभवावयास मिळतात. बाबासाहेबांचे विचार तळागाळातील माणसापर्यत पोहचविण्याचे कार्य आज दलित कवी व कवयित्री करीत आहेत. त्या आपल्या कवितांमधून त्यांना आलेले अनुभव सामाजिक चित्र, त्यांच्या वेदना, अन्याय, अत्याचार तसेच मनातील विविध भाव तरंगाचे दर्शन, जगतांना होणारी घुसमट जात व धर्माच्या पातळीवर होणारे अत्याचार, पुरूषांचे वर्चस्व, स्त्री म्हणून मिळणारी निंम्नस्तरीय वागणूक या सर्व पातळीवर कविता म्हणून आपल्या विचारांना वाट मोकळी करून देतात. आपले जगणे किती क्लेषकारक आहे याचा चिंतनाच्या पातळीवरून वेध घेण्याचा प्रयत्य त्या करीत आहेत.

प्रस्तुत लेखात आंबेडकरवादी काही निवडक कवयित्रींच्या कवितांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. या कवितांमधून एकूणच आंबेडकरवादी कवयित्रींच्या मनातील खदखद व विचार कशाप्रकारे प्रगट झालेले आहेत हे समजते.

कवयित्री ज्योती लांजेवार यांच्या कवितेतून स्त्रियांची होणारी होरपळ, सामाजिक, राजकीय, वैचारिक व प्रेम इत्यादी विषयाला घेवून त्यांच्या कवितांची निर्मिती झालेली आहे हे आढळते. त्या माणसाला केद्रस्थानी मानून आपल्या कवितेचे लेखन करतात. त्यांच्या कवितांमधील स्त्री ही समग्र स्त्री दु:खाच्या जाणीवेतून येते. त्यांनी रेखाटलेले स्त्रियांचे जीवन चित्रण दु:खाच्या विविध छटा दाखविणारे आहेत ही आंबेडकरवादी स्त्री विविध पातळीवर दु:खाने ग्रासलेली आहे. तीला दलित म्हणून अन्याय, अत्याचार सहन करावे लागते. तर कधी वर्ण व्यवस्थेच्या जातीय विळख्याचा सामना करावा लागतो. कवयित्री लांजेवार यांनी आपल्या कवितांमधून स्त्री सामर्थ्याचा परिचय करून देतात व स्त्रियांनी जागृती व्हावे ही प्रेरणा देतात.

ज्योती लांजेवार यांनी स्त्रियांचे जीवन चित्रण रेखाटले तत्पूर्वी त्यांनी स्त्री भावनांचा व जाणिवांचा अभ्यास महाभारतापासून केला आहे. त्यांनी आपल्या कवितांमधून दु:खाचा परिचय करून देतांना पांचालीचे उदाहरण दिले आहे.

'' माझ्या डोळयासमोर सतत उभी असते,
कौरवाच्या राज्यसभेत बेअब्रु होणारी पांचाली ''

या कवितेच्या अनुषंगाने पांचालीसारखी स्त्रियांची विटंबना करणारे दुष्ट माणसे आजही समाजात छाती पुढे करून स्व:ताला श्रेष्ठ म्हनवत आहेत,वावरत आहेत हे दर्शवितात. तर स्त्रियांनी यापुढे बंड करून उठले पाहिजे हा संदेशही देतात.

स्त्रीयांना समाजात सन्मानाने जगता आले पाहिजे त्यांचे स्वप्न त्यांना पूर्ण करता आले पाहिजे. परंतु समाज व्यवस्था याला सातत्याने विरोध करते. ही खंत त्यांच्या मनाला वेदना देणारी आहे. या विरोधात त्या

बंडाची भाषा व्यक्त करतांना दिसतात. '' मला पुन्हा एकदा कुरूक्षेत्र या भूमिवर करावे लागेल? आणि लिहाव्या लागतील गवतावर लाल घोषणा ''

यामधून वस्त्र ओढणाऱ्या दुशासनाचे हात छाटण्याची भाषा त्या बोलतात.

स्त्रीयांना विविध पातळीवर संघर्ष करावा लागतो. पति—पत्नी मधील कौटुंबिक पातळीवर, सामाजिक पातळीवर, पोटाची खळगी भागविण्यासाठी करावा लागणारा संघर्ष तर कधी स्वत:चे पावित्र्य सांभाळत जगणे. त्यावेळी एका आईच्या मनातील भावतरंग ज्योती लांजेवार आपल्या ''अशा अंगाईसाठी ' या कवितेमधून वितरीत करतात.

हात काळोखात उभे, आत तान्हुला रडतो,
देह सजवी माऊली, पान्हा चोळीत गळतो

किंवा

कुणी घेवू नये जन्म, अशा अंगाईच्या साठी ?
वांझ राहीली असती बाळा आलास का पोटी

वेशा व्यवसाय करून आपला संसार चालवणारी एक स्त्री म्हणून तीच्या मानसिक भावना तर एकीकडे एक आई म्हणून आपल्या बाळाला प्रेम न देवू शकणारी असे हे दुहेरी दुख व त्यात होणारा तीचा कोंडमारा याचे चित्रण कवयित्री ज्योती लांजेवार या कवितेमधून रेखाटतात.

वर्गव्यवस्था, वर्णव्यवस्था, लिंगभेद न पाळता विचारांची बंडखोरी कवयित्री म्हणून आंबेडकरवादी समिक्षकांनी यांची नोंद केलेली आहे. त्यांची कविता आपल्या स्वतंत्र विचारांची मांडणी करणारी स्वतंत्र अभिव्यक्ती जाणवते. त्यांच्या प्रत्येक लिखाणामागे तळमळ, तडफड अनुभवावयास मिळते. आपल्या कवितेमधून समाजात होणाऱ्या बदलांचा वेध घेण्याचे सामर्थ्य त्यांच्या कवितेत आहे. तसेच स्त्री — पुरूष संबंधातील बदल जाणवणारे संदर्भ नोंदविले आहे. समाज हा स्त्री—पुरूषामध्ये कशाप्रकारे भेद निर्माण करतो. त्याची भूमिका या संदर्भात कशी पक्षपात करणारी आहे. याची नोंद त्या कवितेमध्ये घेतात. त्या आपल्या कवितेमध्ये दर्शवितात की, नाक्यावर, बसमध्ये, ऑफिसमध्ये, पुरूष उभे कंबर वाकडी करून डोळा मारीत तरी पण त्यांना कोणी वेशा म्हणत नाही. तर हा प्रश्न समाजातील सुज्ञ मंडळींना छळणारा आहे. आपल्या संस्कृतीला सभ्यपणाचा शिक्का मारणारे आपण सोईस्करपणे पुरूषांच्या अशा वर्तणूकीकडे डोळेझाक करतो. पण माणसांचे स्वातंत्र्य जपणाऱ्या समता स्विकारणाऱ्या मल्लिका अमर शेख यांना दुटप्पी धोरणाचा तिरस्कार व चिड निर्माण झाल्याशिवाय राहत नाही. त्या आपल्या कवितेमध्ये लिहीतात.

'' रात्री नवऱ्याच्या मिठीत असतानाच, माझा एकाकी मांजरीत रूपांतर झालं.
कुठूनही,कुठही फेकलं तरी अज्जात पायावर उभ राहणाऱ्या
अन् पोत्यातून,गाडीतून कितीही दुर सोडून आल्या तरी
अचूक , नेमके पणाने परत घरी येणाऱ्या ,
मी नवऱ्याचे कान, गाल चाटले
पंजा पालथा घालून ओला केला,
नंतर सगळं अंग चाटून स्वच्छ केला घराप्रमाणे
आताशा तो मला पोत्यात भरून जंगलात सोडून
नाही कंटाळलाय.

कदाचीत मीच त्याच्या आधी घरी येईन
अशी त्याला भितीवाटत असावी म्हणून.

ही त्यांची कविता समस्त स्त्रियांचे प्रतिनिधीत्व करणारी आहे. यातील मांजर प्रतिकात्मक आहे नवऱ्याचा शब्द झेलण्यासाठी तयार असणाऱ्या, टाकून बोलल, झिडकारला, मारलं तरी पुन्हा—पुन्हा लोचटपणा करणाऱ्या व अन्याय सहण करीत जीवन कंठणाऱ्या स्त्रियांची अवस्था त्या मांडतात.

धड माणूसपण नाही आणि पशूत्वही नाही अशा विचित्र कैचीत सापडलेल्या व दुभंगत जाणाऱ्या माणसाचे अक्राळग्रस्त जीणे त्यांच्या महानगर या एकाच वि ायावरील कवितामधून प्रभावीपणे प्रकट झाल्या आहेत. रंजनवादी शैली टाकून, कल्पना रम्यतेला नकार देत आशयाला भिडणारे वास्तववादी कविता त्यांनी लिहीली.

दलित लेखकाची आत्मचरित्रे किंवा तत्सम साहित्य जेवढया प्रमाणात चर्चेला आली त्या प्रमाणात आंबेडकरवादी कवयित्री लेखिकेचे लेखन अदखलपात्र झाले यात शंका नाही.

' आभाळ पेलतांना' यात १९ कवयित्रींच्या कवितांचा प्रातिनिधिक संग्रह प्रज्ञा दया पवार यांनी संपादित केला. यामध्ये अनुक्रमे हिरा बरसोडे, उषा उभोरे, उर्मिला पवार, कुसुम गांगुंडे, हिरा पवार संजिवनी राजगुरू, आशालता कांबडे, छाया कोरगावकर, ारदा नवले, लता इंगळे, प्रज्ञा दया पवार, शामला गरूड, अभिनया रोकडे, दीपा राजवर्धन, वर्षा मारूती भिसे, आणि कविता मोरवणकर अशा १९ कवयित्रींच्या प्रत्येकी तीन ते चार कवितांचा समावेश करण्यात आलेला आहे. या संग्रहात मागील पन्नास वर्षातील जेष्ठ कवयित्री तथा ताज्या दमाच्या कवयित्रींचा समावेश आहे. एकुणच पन्नास वर्षाचा सामाजिक जगण्याचा लेखाजोखा मांडला आहे.

पहिली पिढी हिरा बनसोडे, शकुंतला रोकडे, उषा अंभोरे, उर्मिला पवार, कुसुम गांगुर्डे, हिरा पवार, संजीवनी राजगुरू, आशालता कांबळे यांच्या कविता आहेत. छाया कोरगावकर, शारदा नवले, लता इंगळे, विद्या भोरजाडे, स्मिता नगरकर, प्रज्ञा दया पवार, शामल गरूड, अभिनया रमेश लता इंगळे, यांची दुसरी पिढी तर वर्षा मारोती भिसे, दिपा राजवर्धन, कविता भोजवणकर, यांची पुढील पिढी.

या १९ कवयित्री पैकी प्रज्ञा दया पवार, शामल गरूड, आणि अभिनया रमेश यांच्या कविता लक्षणीय वाटतात. त्यांची शैली, वेगळेपणा, कवितेची भक्कम अशी मांडणी, तर कुठे मराठी भाषेमध्ये इंग्रजीचा वापर बघायला मिळतो. या तीन कवयित्रींचे काही काव्य पंक्ती पुढीलप्रमाणे —

प्रज्ञा दया पवार यांनी आपली संवेदना मांडली आहेत. त्या म्हणतात—

या चिरव्याकुळ एकाकी पणाच्या होर्डीगवर
उभारून आम्ही पसरवतोय आमच्या मोकळया ढाकळया
हाडामासाच्या प्रतिमा

भारतीय समाजाच्या बहुजन स्त्रीचे दु:ख अनादीकाळापासून अव्याहत सुरू आहे. मोठमोठया मेट्रोसिटीमध्ये बाजारीकरणाच्या व्यवस्थेत तीचे अर्धवड झाकलेले व दु:खाने पिंजून अस्थिपंजर झालेल्या शरिराचे प्रदर्शन त्या अनुभवतात.

तर शामल गरूड आपल्या इझम पलीकडील' कवितेमध्ये स्त्रीयांचे दु:ख मांडतांना म्हणतात,

कातडी सोलून तीने सांगीतल्या नाहीत
त्याच्या रांडकथान्या

या मेट्रो शहराच्या एका धुरकट गर्दीत
न्युड चित्रासारखी ती फक्त डकललेली

मुळातच दलित स्त्रियांच्या वाटयाला येणारे वेदनामय जीवन अवहेलना, भूक, लाचारी ही तर पाचविला पुजलेली आहे. तरी पण आपल्या दु:खाचा बाहू न करता आलेल्या परिस्थीतीशी संघर्ष करीत ती ताठ मानेने उभी आहे.

दुपारी

तुझा आकस चेहरा ओलांडून । Lunchtime करतात
वापरतात फ्राईडचा anatomy is destiny चा ।
Retuted सिध्दांत । जागतीक उदारिकरणाच्या अर्थव्यवस्थेत तुला
केलय sex worker.
मी इथे तु मात्र ठराविक जातीची

अशाप्रकारे 'तू' या आपल्या कवितेमध्ये अभिनया रमेश यांनी जागतीकीकरणात स्त्रीयांच्या वाटयाला येणारे भोगदास्य अत्यंत समर्पक शब्दामध्ये मांडलेले आहे.

हिरा बनसोडे, उषा आंबोरे, उर्मिल पवार, शकुंतला रोकडे, हिरा पवार, संजीवनी राजगुरू आशालता कांबळे या कवयित्रीं महामानव बाबासाहेबांच्या प्रबोधनरूपी चळवळीचे बाळकडू प्यालेले आहेत. त्या झंजावातातील प्रत्यक्ष साक्षीदार होत्या. ज्याप्रमाणे बाबासाहेबांना समाजबदलाची भूक लागलेली होती तीच भावना यांच्याही कवितेमधून प्रत्ययास येते. त्यांच्या कवितेत बाबासाहेब, रमाई, भगवान बुध्द यांचे संदर्भ येतात. गुलामगिरीला मुठमाती देवून स्वयंप्रकाशाकडे जाण्याची उर्मी त्यांच्या कवितेमध्ये पाहायला मिळते. भिमाची लेखणी या कवितेमध्ये कवयित्री हिरा बनसोडे म्हणतात,

मी नाहीच फक्त गृहिणी । अन् नाही शोभेची चांदणी ।
अपरंपार वेदनेतून उफाडलेली। मी आहे विधवांची जननी ।

आपल्या यातनातून तावून सुलाखून निघालेली ही आंबेडकरवादी स्त्री फक्त शोभेची वस्तू म्हणून जगणार नाही तर प्रत्येक अन्याय अत्याचाराचा प्रतिकार करण्यासाठी ती सिध्द झाली आहे.

तर रिंगण या आपल्या कवितेमध्ये कवयित्री उषा आंबोरे यांनी स्त्रीयांच्या वाटयाला परंपरेने आलेले देवघर विविध देवीदेवतांच्या मिळालेल्या प्रतिकात्मक उपमा नाकारून यापुढे हातातील शस्त्रांना धार लावावी लागेल असा गर्भीत इशारा देतात

परंपरेचे नकाब चढवून । त्यांनी मला देवघरात बसविले ।
आणि हातात शस्त्र देतांना मात्र । धार लावण्यास मनाई केली ।

नवा धर्म' या आपल्या कवितेमध्ये शकुंतला रोखडे आपल्या भावना व्यक्त करतांना म्हणतात,

पराकोटीच्या अहिंसेचे तत्वज्ञान रूजलेल्या । आपल्या गुजर भूमिवर ।
पराकोटीचा हिंसाचार उसळतो तर ।
या भूमिला कोणाची अहिंसा अभिप्रेत आहे ?

आपल्या देशाला जात,धर्म, वर्गीय व वर्णीय हिंसाचाराच्या घटनेचा इतिहास आहे. या राष्ट्रामध्ये मानवतावाद जिवंत ठेवावयाचा असेल तर विकसित व गतिमान राष्ट्र निर्माण करावयाचे असेल तर शांती व सौहार्दाचे वातावरण अभिप्रेत आहे. यासाठी बुध्दाच्या शांतीशिवाय पर्याय नाही हा संदेश त्या देतात.

'अन् बाबा' या कवितेमध्ये संजीवनी राजगुरू आपल्या कवितेमध्ये म्हणतात की,

ठार कोण्या वाळवंटी आयुष्यात । तुमच्या प्रज्ञेचा एक किरण प्रवेशला ।
अन् बाबा त्या प्रकाशाने हजारो वर्षाचा अंधार तेजोमय झाला ।

हजारो वर्षाच्या गुलामगीरीचे पाश बाबासाहेबांच्या प्रयत्नामुळे बंधनमुक्त झाले आणि त्यामुळे कोटयावधी जनांचा उध्दार झाला. अशा प्रकारे कृतज्ञतेची भावना व्यक्त करतात.

तर आपल्या बाईपणाची किंमत या कवितेत कवयित्री आशालता कांबळे विचार व्यक्त करतांना म्हणतात,

मी एक आधुनिक स्त्री । बाबासाहेबांनी बहाल केल्या बौध्द तत्वज्ञानातील ।
माणुसपणाला साद घालणारी ।

बाबासाहेबांनी दिलेले ज्ञानामृत पिवून मी एक आधुनिक विज्ञानवादी पुरोंगामीत्वाचा विचार करणारी स्त्री आहे. मी माणसातील माणुसकीला साद घालीत आहे कारण मला माणुसपण जीवंत ठेवायचा आहे.

भीम माई' या कवितेमध्ये हिरा पवार आपले विचार व्यक्त करतात

लागे भिम माई ओसाड भूमिला । हस्त स्पर्श झाला सुजला सुफला ।
अज्ञानाच्या हाती प्रज्ञेचा नांगर । शिलाचा आसूड जुन्या रूढीवर ।

आज आपला समाज अज्ञानातून जागृत होवून व्यक्तीत्व विकासाच्या दृष्टीने वाटचाल करीत आहे. जुनी रूढी परंपरा त्यागून प्रज्ञानरूपी नांगराने आपल्या मनाची नांगरणी करीत आहे. आज आपण शिलाचा आसूड वापरून जुन्या रूढी परंपरेवर प्रहार करीत आहोत. या साऱ्याच कवयित्रीच्या कवितांचे अवलोकन केले असता त्याचे विषय आशय शब्दकला आंबेडकर विचारांची देणगी, बुध्दाच्या विचारांचा परिणात रूढीबंधनातून झालेली मुक्तता, व जागृत झालेले आत्मभान त्यामधुनच व्यक्तिमत्व विकासाकडे होत असलेली वाटचाल प्रत्ययास येते.

छाया कोरगावकर, शारदा नवले, लता इंगळे, विद्या भोरगारे, डॉ. स्मिता नगरकर या मधल्या पिढीचे प्रतिनिधीत्व करतात. यांनी आपल्या कवितेत व्यक्तिगत दु:खा बरोबर सामाजिक शल्य मांडलेले आहे.

शरीराच्या कोणत्या बिंदू पासून । सुरू होत बाईच बाईपण?
नेमक्या कुठल्या ग्रंथी वितळतात । निखालस वात्सल्याच्या विराट प्रवाहात।
रिती झाली माझी ओजळ । तरीही इच्छांची वादळ राहतात घोंगावत
अधूनमधून
यातनांची वारूळ अशी वाहताहेत सर्वांगाभोवती । बंड करून उठले आहे मी।
पुन्हा –पुन्हा तथागत ांततेसाठी ।
मिटून नाही घ्यायचे मला ।
या पृथ्वीच्या गर्भात
मला न्हाऊन निघायचे आहे
सुर्याच्या कोवळया प्रकाशात सुर्यफुल होण्यासाठी
टचकन टोचली जाते सुई मनगटात । जात वाहून नेणारी ।
या पिढीतून त्या पिढीकडे अशीच वाहत जाते जात
व्यवस्थेच्या स्टॅंडला टांगलेली बॉटल । ग्लुकोज नसलेली ।

जातीच्या रसायनाने भरलेली ।
किंवा
उर भरून हुंदका देतो तुझ्या प्रेमाच्या वात्सल्याचे।
दाटूनी कंठ येती तू काढलेला गरीबीतील कारूण्याने
राब राब राबूनी उभा टाकला संसार
उच्च संगोपन शिक्षण आम्हा दिले संस्कार

कवयित्री शारदा नवले यांनी तथागत या कवितेमध्ये बाईमधील विविध वैशिष्टयांचे वर्णन करून या जगात तथागतांना अभिप्रेत असणारी शांतता निर्माण व्हावी ही अपेक्षा व्यक्त करतात तर कवयित्री लता इंगळे या सुर्याच्या प्रखर अशा तेजाने प्रकाशमान होवून किंवा सोनाराच्या भट्टीतील सुवर्णालंकाराची घडण होते त्याप्रमाणे परिस्थीतीचे हास्य न स्विकारता पुन्हा नव्या जोमाने संघर्षरत व्हायचे आहे हा आशावाद व्यक्त करतात. तर 'जात' या कवितेमध्ये विद्या राजभोर भारतीय समाजातील जाती वैशिष्टये रेखाटतांना जी कधीही जात नाही ती जात जन्मापासून मृत्यू नंतरही कशा प्रकारे दाहक चटके देते तिचा दंश कशा प्रकारचा आहे याचे विदारक चित्र रेखाटतात. तर 'आई' या कवितेत विद्या नगरकर म्हणतात, आपल्या आईने कसा गरीबीत संसार केला जगत असतांना तिला कोणकोणत्या परिस्थीतीचा सामना करावा लागला. तरी आम्हाला घडविण्यात तिने तसूभरही कसर सोडली नाही. तिच्या संस्काराच्या सिदोरीमधून आम्हाला उच्च शिक्षण घेता आले ही आई विषयी आत्मीयता व्यक्त करून ती मान्य करीत आहे.

एकूणच कवितेमधील स्त्री जीवन व त्यांचे भावविश्व सामाजिक जाणीव, वैचारिकता व विद्रोह या सर्व बाबींचे चित्रण करतांना त्यांच्या मागे बाबासाहेबांचे आदर्श आहेत. स्त्रियांचे भावविश्व मांडतांना दु:खाच्या व प्रेमाच्या अनुषंगाने त्या करतात. सामाजिक उणिवांची दखल घेत स्त्रीवर होणाऱ्या अत्याचाराचे वर्णन त्या करतात. सर्वसामान्य वर्गातील स्त्रियापेक्षा यांच्या वाटयाला येणारे दु:ख अधिक बिकट आहे. त्यांच्या वाटयाला येत असलेले वेशापण इतरांचे संगोपन करीत स्वत: भाव अस्तित्व शून्य होते. सामाजिक व राष्ट्र पातळीवरील सौहार्द टिकावा ही काळजी नेता वर्ग हा कसा स्वार्थी बनला आहे त्यांच्या स्वार्थापुढे राष्ट्रहित ही संकल्पना फक्त कागदावर लिहायची असते. जाती जातीमधील वैश्यम्य दुर होवून समाज एकसंघ व्हावा ही वेदना त्यांची आहे. त्याबरोबर स्त्रीवर्गावर होणारे अन्याय, अत्याचार, अंधश्रध्दा, अन्यायग्रस्त रूढी परंपरा, धार्मीक दंगली, कौटूबिक वादविवाद या सर्व बाबींचे चित्रण आपल्या काव्यामध्ये मांडतात. त्यांच्या कविता,सामाजिक प्रश्नांनी, व्यक्तिगत दु:खद अनुभवानी भरलेल्या आहेत. यास्तव कवितामधून विषमता रूपी अंधार दुर करण्यासाठी व समतावादी समाज निर्मिती साठी प्रसंगी विद्रोहाचा आधार त्या घेत आहेत.

**संदर्भ सूची :–**

१. कुलकर्णी, द.भि., दिशा, निखिल प्रकाशन, नागपूर, १९८२
२. कुलकणी द.भि., प्रस्तावना
३. लांजेवार ज्योती, हिरव्या गवतावर लाल घोषणा दिशा निखिल प्रकाशन, नागपूर, १९८२, पृष्ठ ७